**स्पेशल केस क्रमांक : ९८/२०२४**

**सरकार वि. शेख शाहरुख व इतर**

**निशानी क्रमांक : १२९**

**साक्षदार क्रमांक १७ ची जबाणी सरकारतर्फे**

(आरोपींना व्हीसी वर हजर करण्यात आले)

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि,

| | | |
|---|---|---|
| **साक्षदाराचे नाव** | : | **दत्तराम शांताराम आंग्रे** |
| **वय** | : | **४५ वर्ष** |
| **व्यवसाय** | : | **नोकरी** |
| **राहणार** | : | **धायरी, पुणे.** |

**सरतपासणी सरकारतर्फे श्री व्ही.डी. हुकरे सरकारी वकीलांमार्फत :-**

1. मी नोडल ऑफीसर म्हणुन वोडाफोन आयडीया कंपनी मधे काम करतो. मला दिनांक १५/०१/२०२४ ला डीसीपी क्राइम ब्रांच यांचे कडुन सीडीआर, एसडीआर आणि कॅप फॉर्म मिळण्याकरीता पत्र आले होते. त्या पत्रात ९१४६९६९७५४ व ८२०८०३४८६४ या दोन नंबर संबंधीत माहिती मागीतली होती. त्या पत्राची प्रत माझे जवळ आहे. ते **नि.क्र.१३०** वर आहे. कंपनीचा फोनचा संबंधीतचा डेटा सर्वर मधे आपोआप सेव्ह होतो. त्यामधे कोणीही झेडझाड करु शकत नाही. पोलीसांच्या पत्राप्रमाणे मी कव्हरींग लेटर सह सीडीआर, एसडीआर आणि कॅप फॉर्म दिले होते.

**कोर्टाची वेळ संपल्यामुळे पुढील सरतपासणी पुढील तारखे पर्यंत तहकुब**

दिनांकः ०९/०४/२०२६ (एम.एस. गणोरकर)

नागपुर विशेष न्यायाधीश,

मादक द्रव्ये व अंमली पदार्थ अधि.

न्यायालय, नागपुर.

दिनांक २४/०४/२०२६

**पुढील सरतपासणी सरकारतर्फे श्री व्ही.डी. हुकरे सरकारी वकीलांमार्फत :–**

2. अंजुम नाईकवाडी हे दुसरे नोडल ऑफीसर माझ्या सोबत काम करायचे. दिनांक १७/०१/२०२४ च्या पत्रा वरुन मी ९१४६९६९७५४ व ८२०८०३४८६४ या दोन नंबरचे कॅफ फॉर्म, सीडीआर आणि एसडीआर डेटा कलम ६५बी भारतीय पुरावा कायदा प्रमाणे लागणा–या प्रमाणपत्रा सह दिले होते. कलम ६५ब चे प्रमाणपत्र मला दाखवले. त्यावर अंजुम नाईकवाडी यांची सही आहे. ती मी ओळखतो. ते **नि.क्र.१३१** वर आहे. ९१४६९६९७५४ या नंबरचा कॅफ फॉर्म रोशन सुरेश चौधरी याच्या नावाने दिनांक १५/०७/२०२१ पासुन आहे. ते सीम सिए रोड नागपुर येथुन घेतलेले आहे. त्या फॉर्म बरोबर आधार कार्ड ची प्रत लावलेली आहे. तो कॅफ फॉर्म कागदपत्रांसह **नि.क्र.१३२** वर आहे. ८२०८०३४८६४ हा नंबर यशवंत बिश्राम राउत याच्या नावाने आहे. ते सीम गोरेगाव, जि. गोंदिया येथुन घेतलेले आहे. त्याच्या कॅफ फॉर्म केस सोबत जोडलेला आहे. त्याला **नि.क्र.१३३** देण्यात आला. सीडीआर मधे पहिल्या कॉलम मधे ज्याची माहिती आहे त्याचे नाव असते. दुस–या कॉलम मधे येणारा कि जाणार कॉल याची माहिती असते. तिस–या मधे कोणत्या प्रकारचे कनेक्शन आहे. ज्या नंबरशी संपर्क झाला तो नंबर पुढच्या कॉलम मधे दिसतो. सात नंबर कॉलम मधे कॉलची तारीख व आठ नंबर कॉलम मधे वेळ दिलेली आहे. त्यानंतर किती वेळ बोलणे झाले ते लिहिले असते. दहा नंबर कॉलम मधे ज्या टॉवर अंतर्गत तो फोन असतो ती माहिती दिली आहे. तसेच कॉल केव्हा संपला ते बारा नंबर कॉलम मधे लिहिलेले असते. दोन्ही फोनचे सीडीआर मला दाखवले त्यावर नाईकवाडी यांच्या सह्या आहेत. ते **नि.क्र.१३४ व १३५** वर आहे.

**उलटतपासणी आरोपी क्र. १ ते ३ करीता श्री शेख सबाहतउल्ला वकिलांमार्फत** :–

3. हे म्हणणे खरे नाही कि कंपनीने कोणतेही डॉकुमेंट दिलेले नाही.

**फेरतपासणी**

4. काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

माझ्या समक्ष,

दिनांकः २४/०४/२०२६

नागपुर

(एम.एस. गणोरकर)

विशेष न्यायाधीश,

मादक द्रव्ये व अंमली पदार्थ अधि.

न्यायालय, नागपुर.